गांवकरी
www.gavakari.net
22 Aug 2025 - Page 6

# वाघ शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी साकारले इकोफ्रेंडली बाप्पा

## २,८०० हून अधिक विद्यार्थ्यांचा कार्यशाळेत सहभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १७ ऑगस्ट) सकाळी आठ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय कॅम्पस येथे इकोफ्रेंडली गणेश अर्थात शाडूपासून गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली.

यावेळी जिल्ह्यातील विविध शाळांच्या २,८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी हजेरी लावत गणपती बाप्पाच्या मूर्ती साकारल्या. यांपैकी बहुतांश विद्यार्थी हे त्यांनी साकारलेल्या शाडूच्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठा करणार आहेत.




या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे नाशिक ग्रामीणचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त शकुंतलाताई वाघ यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, प्राचार्य पी. टी. कडवे, प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे तसचे विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. दिवसेंदिवस पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, त्याचप्रमाणे बाजारात विकल्या जाणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शाडूपासून गणेशमूर्ती तयार करून त्याची प्राणप्रतिष्ठा करावी, या हेतूने हा उपक्रम राबविला जातो, असे अजिंक्य वाघ यांनी सांगितले. सूत्रसंचालन सारंग नाईक व योगेश गायधनी यांनी केले. कार्यशाळा यशस्वितेसाठी संस्थाध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळा यशस्वितेसाठी प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

'इकोफ्रेंडली गणेश' कार्यशाळेस शहरी भागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यशाळेत सहभाग घेत शाडूपासून सुबक, सुरेख व देखण्या गणेशमूर्ती साकारल्या. या मूर्ती बघून संस्कृती, संस्कार साध्य होताना पाहून मनस्वी आनंद होत आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती ही आजची गरज आहे. के. के. वाघ शिक्षण संस्था दरवर्षी हा स्तुत्य उपक्रम राबवते, असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांनी केले.